आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१७ जानेवारी २०२५ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- १५ फेब्रुवारी नंतर औषध वगळता इतर कुठल्याही खरेदीला मान्यता न देण्याचे वित्त विभागाचे सरकारी कार्यालयांना आदेश
- एसटी महामंडळात भाडेतत्त्वावर बस घेणं बंद, दरवर्षी ५ हजार बसची खरेदी होणार
- २०२७ मधल्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक - त्र्यंबकेश्वर धार्मिक कॉरिडोरची निर्मिती करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश
- पुणे-नाशिक महामार्गावर झालेल्या अपघातात नऊ जणांचा मृत्यू, मृतांच्या कुटुंबांना राज्य सरकारकडून ५ लाख रुपयांची मदत जाहीर

**आणि**

- राष्ट्रीय क्रीडा आणि साहसी पुरस्कारांचे राष्ट्रपतींच्या हस्ते वितरण, स्वप्निल कुसळे, सचिन खिलारी, दीपाली देशपांडे, मुरलीधर पेटकर, उमेश झिरपे यांचा गौरव

**<><><><><>**

चालू आर्थिक वर्षातला निधी खर्च करायचा म्हणून १५ फेब्रुवारी नंतर औषध वगळता इतर कुठल्याही खरेदीला मान्यता देऊ नये, असे आदेश राज्य सरकारच्या वित्त विभागानं सरकारी कार्यालयांना दिले आहेत. संगणक, झेरॉक्स मशीन, फर्निचर दुरुस्ती, कार्यशाळा आयोजन यासारख्या गोष्टी करण्यालाही वित्त विभागानं मनाई केली आहे. आर्थिक वर्षाच्या शेवटच्या कालावधीत निधी संपवण्यासाठी

मोठ्या प्रमाणात होत असलेल्या खरेदीला आळा घालण्यासाठी हे परिपत्रक जारी केलं आहे.

**<><><><><>**

एस. टी महामंडळ दरवर्षी स्वमालकीच्या ५ हजार साध्या बस खरेदी करणार आहे. त्यासाठीमहामंडळा अंतर्गत पंचवार्षिक नियोजन करण्याचा निर्णय परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज जाहीर केला. तसंच महामंडळात यापुढे कुठल्याही पद्धतीनं भाडेतत्त्वावर बस न घेण्याचा निर्णय घेतल्याचंही सरनाईक यांनी सांगितलं. नवीन बसेसच्या तिन्ही बाजूंना डिजिटल जाहिरातीची व्यवस्था करण्याची सूचना त्यांनी केली. महामंडळानं उत्पन्न वाढीसाठी पूरक योजना आणाव्यात, कर्मचाऱ्यांचं वेतन प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेपर्यंत देण्याची काळजी घेतली जावी, त्यासाठी शासनाकडून महामंडळाला मिळणारा निधी आगाऊ स्वरूपात मिळण्यासाठी प्रस्ताव तयार करण्याच्या सूचनाही परिवहन मंत्र्यांनी अधिकाऱ्यांना बैठकीत दिल्या.

**<><><><><>**

नाशिक जिल्ह्याला राज्याचं धार्मिक केंद्र म्हणून विकसित करण्याच्या दृष्टिने नाशिक - त्र्यंबकेश्वर धार्मिक कॉरिडोरची निर्मिती करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिले. नाशिक आणि त्र्यंबकेश्वर इथे २०२७ मध्ये भरणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या अनुषंगानं पूर्वतयारीविषयी आज सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या बैठकीत ते बोलत होते. सिंहस्थ कुंभमेळ्यात देशभरातल्या धार्मिक परंपरेचे दर्शन घडावं, यासाठी नाशिकजवळ मोठं महाकुंभ तयार करावं. यामध्ये देशातली तसंच राज्यातली मंदिरं, तिर्थक्षेत्रं, सांस्कृतिक वारशाचे भाविकांना दर्शन घेता येईल, असे मोठे संमेलन केंद्र उभारावे, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

गोदावरी नदीकाठाच्या विकासाला प्रोत्साहन द्यावं, प्रमुख मंदिरांमध्ये राहण्याची व्यवस्था करावी, साधुग्रामसाठी अतिरिक्त जमीन संपादित करण्यात यावी तसंच संबंधित जागांवरची बेकायदेशीर अतिक्रमणं हटवावीत असे आदेशही यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिले.

**<><><><><>**

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या बैठकीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस २० ते २४ जानेवारी या काळात दावोसला जाणार आहेत. राज्याच्या सर्व क्षेत्रात आणि सर्व विभागात गुंतवणूक आणण्याचा प्रयत्न असेल असं मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

अभिनेता सैफ अली खानवर हल्ल्याप्रकरणी मुंबई पोलिसांनी एका संशयिताला पकडलं आहे. त्याला वांद्रे पोलीस ठाण्यात नेलं असून त्याची कसून चौकशी करण्यात येत आहे. दरम्यान सैफ अली खान यांच्यावर शस्त्रक्रीया करून पाठीत अडकलेला चाकूचा तुकडा डॉक्टरांनी काढला आहे. सैफ यांच्या जिवाचा धोका टळला असला तरी विश्रांतीचा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे.

**<><><><><>**

पुणे-नाशिक महामार्गावर आज सकाळी एका टेम्पोनं मिनीव्हॅनला दिलेल्या धडकेत नऊ जणांचा मृत्यू झाला. ही घटना सकाळी दहा वाजता नारायणगावजवळ घडली. ही मिनीव्हॅन नारायणगावच्या दिशेनं जात असताना पाठीमागून टेम्पोनं धडक दिल्यानं ती रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या रिकाम्या बसवर आदळली, अशी माहिती पुणे ग्रामीण पोलिसांनी दिली. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे. या अपघातातल्या मृतांच्या नातेवाईकांना त्यांनी ५ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे.

**<><><><><>**

स्थानिक केबलचालकांची नोंदणी सुलभ करण्यासाठी १९९४ मधल्या केबल टेलिव्हिजन नेटवर्क नियमांमधे दुरुस्ती करणारी अधिसूचना आज माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने जारी केली. त्यानुसार आता ही नोंदणी पूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने होईल आणि अर्जदारांच्या कागदपत्रांची पडताळणी केल्यावर प्रत्यक्ष परवाने देण्यात येतील. देशात सर्वत्र त्याची मुदत ५ वर्ष करण्यात आली आहे. नूतनीकरण शुल्क आता ५ हजार रुपये करण्यात आलं असून नूतनीकरणासाठीची मुदत परवाना संपण्यापूर्वी किमान ९० दिवस पर्यंत ठेवली आहे.

**<><><><><>**

क्रीडा क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरीसाठी देण्यात येणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा आणि शौर्य पुरस्कारांचं वितरण आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते झालं. नवी दिल्ली इथं झालेल्या कार्यक्रमात देशातला सर्वोच्च क्रीडा सन्मान मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार बुद्धिबळाचा जगज्जेता डी गुकेश, हॉकी संघाचा कर्णधार हरमनप्रीत सिंग, पॅरा ॲथलीट  प्रवीण कुमार, आणि नेमबाज मनु भाकर या चौघांना प्रदान करण्यात आला. ३२ खेळाडूंना अर्जुन पुरस्कारानं गौरवण्यात आलं. क्रीडाप्रशिक्षकांना देण्यात येणारा द्रोणाचार्य पुरस्कार नेमबाजी प्रशिक्षक दीपाली देशपांडे यांच्यासह ५ जणांना प्रदान करण्यात आला. राज्यातला नेमबाज स्वप्नील कुसाळे आणि पॅरा अथलीट सचिन खिलारी यांच्यासह ३२ खेळाडूंना अर्जुन पुरस्काराने गौरवण्यात आलं. ज्येष्ठ खेळाडू सुचा सिंग आणि दिव्यांग जलतरणपटू मुरलीकांत पेटकर यांना जीवनगौरव अर्जुन पुरस्कार देण्यात आला.  ज्येष्ठ गिर्यारोहक उमेश झिरपे यांना तेनझिंग नोर्गो राष्ट्रीय साहसी जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**<><><><><>**

नैरोबीहून भारतात आलेल्या एका प्रवाशाला मुंबई विमानतळावर अंमली पदार्थ विरोधी पथकाच्या अधिकाऱ्यांनी आज अटक केली. त्याच्याकडून सुमारे पावणे ३ किलो वजनाचे 2 कोटी 62 लाख रुपये किंमतीचे अंमली पदार्थ जप्त केले.

**<><><><><>**

फोनकॉलच्या माध्यमातून होणारी फसवणूक तसंच मोबाईलचा गैरवापर यांना आळा घालण्यासाठी संचार साथी नावाच्या नवीन ॲपच अनावरण आज केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी केलं. ग्रामीण भागातल्या जास्तीत जास्त कुटुंबाना इंटरनेट सुविधा मिळावी या उद्देशाने सुरू झालेल्या नॅशनल ब्रॉडबँड मिशनच्या दुसऱ्या टप्प्याची सुरुवातही त्यांनी केली. डिजिटल भारत निधीच्या अंतर्गत उभारलेल्या सुमारे २८ हजार मोबाइल टॉवरच्या सुविधेचा उपयोग आता कोणत्याही मोबाइल कंपनीला करता येईल. त्यामुळे ग्राहकांसाठी नेटवर्कची उपलब्धता सुधारेल. संचार साथी या नवीन ॲप्लिकेशनविषयी ऐकुया आमच्या प्रतिनिधीकडून…

## होल्ड व्हाईस कास्ट

*फोन, मेसेज किंवा ॲपच्या माध्यमातून होणाऱ्या सायबर फसवणुकीची तक्रार करता यावी, आपल्या नावाने काढलेली खोटी फोन कनेक्शन्स ओळखता यावीत, अशा विविध तक्रारी संचार साथी या एकाच ॲप्लिकेशनच्या माध्यमातून सोडवता येणार आहेत. यात फोनवरून होणाऱ्या सायबर फसवणुकीची तक्रार नोंदवण्यासाठी चक्षु नावाचा पर्याय देण्यात आला आहे. त्यात नोंदणी करताना संबंधित फोन क्रमांक किंवा मेसेजचे तपशील भरल्यानंतर ही तक्रार नोंदवली जाईल. त्या खेरीज हरवलेला किंवा चोरीला गेलेला फोन शोधून तो ब्लॉक करणं, आपल्या नावे दाखल असलेली खोटी फोन कनेक्शन शोधणं तसंच संशयित आंतरराष्ट्रीय कॉलची तक्रार करण्यासाठी पर्याय देण्यात आले आहेत. आकाशवाणी बातम्यांसाठी रश्मी पाटकर, मुंबई*

**<><><><><>**

बीड जिल्ह्यातल्या आष्टी तालुक्यात, वाहिरा परिसरात दोन सख्ख्या भावाची निर्घृण हत्या करण्यात आली. अजय भोसले आणि भरत भोसले, अशी त्यांची नावं आहेत. हत्येचं कारण अद्याप अस्पष्ट असल्याचं पोलिसांकडून सांगण्यात येत आहे.

दरम्यान, बीड जिल्ह्यात अंबाजोगाई शहरात एका युवकावर त्याच्या मेहुण्यानं गोळीबार केला. प्रसंगावधान राखल्यामुळे तो युवक बचावला.

**<><><><><>**

रत्नागिरीत उद्या आणि परवा तिसरं अखिल मराठा महासंमेलन होत आहे. या महासंमेलनाचं आयोजन  अखिल मराठा फेडरेशनने क्षत्रिय मराठा मंडळ, मराठा मंडळ आणि अन्य अनेक संस्थांनी केलं आहे.

**<><><><><>**

तीन दिवसांच्या तेजीनंतर देशातले शेअर बाजार आज पुन्हा कोसळले. दिवसअखेर सेन्सेक्स ४२३ अंकांनी घसरुन ७६ हजार ६१९ अंकांवर बंद झाला. निफ्टी १०९ अंकांनी घसरुन २३ हजार २०३ अंकांव बंद झाला. माहिती तंत्रज्ञान आणि वित्तीय सेवा क्षेत्रातल्या समभागांमध्ये मोठी घसरण दिसून आली.

**<><><><><>**

राज्यात काल हवामान सर्वत्र कोरडं होतं. कोकणात तुरळक ठिकाणी सरासरीच्या तुलनेत किमान तापमानात लक्षणीय वाढ झाली, तर मध्यमहाराष्ट्रात तुरळक ठिकाणी किमान तापमानात किंचित वाढ झाली. राज्यात सर्वात कमी तापमान महाबळेश्वर इथं १४ पूर्णांक ७ अंश सेल्सियस नोंदलं गेलं.

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील, असा वेधशाळेचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**